संपादकीय
राकेश शंकर गोरे

# जगातील पहिला 'एआय' नियमन कायदा




युरोपीय महासंघाने ९ डिसेंबर रोजी तब्बल ३७ तासांच्या वाटाघाटीनंतर जगातील पहिला कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर आणि नियमनाबाबत कायदा येत असल्याची माहिती दिली. कृत्रिम प्रज्ञेवर आधारित अनेक साधने व त्यांच्या सर्रास होणारा वापर याबाबतचा हा कायदा ऐतिहासिक मानला जातो. युरोपीय महासंघाचे कमिशनर थियरी ब्रेटन आणि महासंघाच्या अध्यक्षा उसुर्ला वॉन डर लेयन यांनी याबाबत 'एक्स' (ट्विटर) पोस्टद्वारे माहिती दिली. सध्या या कायद्याबाबत युरोपीय महासंघामधील सर्व देशांमध्ये हा करार झाला आहे. २०२४च्या सुरुवातीला युरोपीय संसदेत या प्रस्तावावर मतदान होणार आहे. साधारण २०२५ पर्यंत हा कायदा लागू होण्याची शक्यता वर्तवली जाते. जगभरात 'एआय'च्या सुरक्षित वापराबद्दल चर्चा चालू असताना युरोपीय महासंघाने असा कायदा प्रस्तावित करून समस्त जगासमोर आदर्श निर्माण केला आहे. अमेरिका, चीन, ऑस्ट्रेलिया इ. अशा अनेक देशांमध्ये 'एआय'च्या वापराबद्दल कायदा आणण्याच्या चर्चा चालू आहेत. युरोपीय महासंघाच्या या निर्णयामुळे जगभरातील इतर देशांना प्रेरणा मिळेल, हे नक्कीच! 'एआय'चे संभाव्य धोके लक्षात घेता या पावलाचे स्वागत होताना दिसत आहे. यामुळे 'एआय'च्या गतीवर परिणाम होईल, हे देखील बोलले जाते. युरोपीय महासंघाच्या नव्या 'एआय' कायद्यानुसार 'एआय'च्या वापरावर अनेक प्रकारे निर्बंध येणार आहेत. लोकांच्या सुरक्षिततेला, अधिकाराला ठेच न पोचवता 'एआय'चा वापर तंत्रज्ञानाचा विकास करण्यासाठी व्हावा, हे या कायद्यामागचे प्रमुख कारण आहे, असे युरोपीय महासंघातर्फे स्पष्टकरण्यात आले आहे.

- फेशियल रेकग्निशनचा वापर असलेल्या बऱ्याच 'एआय' ॲप्सवर आता निर्बंध घालण्यात येणार आहेत. मानवी वर्तनावर ताबा मिळवण्यासाठी ह्यएआय'चा वापर आटोक्यात राहावा, यासाठी नियम करण्यात येतील.

- जनरेटिव्ह 'एआय'च्या वापरावर निर्बंध नसणार आहेत. पण ही अशी ॲप्लिकेशन बनवणाऱ्या कंपन्यांना वैधानिक इशारा देणं गरजेचं असणार आहे. त्याचबरोबर या अशा 'एआय' साधनांनी डेटा (विदा) कुठून संग्रहित केला किंवा कुठला डेटा वापरून ते ॲप्लिकेशनचे प्रशिक्षण झाले, हे प्रामुख्याने सांगणे बंधनकारक असणार आहे.

- काही 'एआय' ॲप्लिकेशनवर सरळसोट बंदी घालण्यात येणार असून, काही ॲप्सवरील डेटा साठवणीकडेही काटेकोरपणे लक्ष देण्यात येणार आहे.

उल्लंघन करणाऱ्यांना दंड

उच्चतम जोखमीच्या क्षेत्रांमध्ये 'एआय'चा वापर प्रतिबंधित प्रमाणात होईल. पण स्वयंचलित वाहनांमधील तसेच ऑटोमोबाईल क्षेत्रातील 'एआय'च्या वापराबद्दल काहीच वाच्यता न झाल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. सुरक्षिततेच्या कारणास्तव दहशतवादी हल्ला, दंगल, धार्मिक अथवा सामाजिक ताणतणावाच्या प्रसंगी संशयीत गुन्हेगारांवर नजर ठेवण्यासाठी किंवा हरवलेल्या व्यक्तींचा शोध घेण्याकरिता 'एआय'प्रणित 'रियल टाईम बायोमेट्रिक सर्व्हिलन्स'चा वापर करण्यात येणार आहे. सीसीटीव्ही कॅमेरा, इमेज रेकग्निशन, डीपलर्निंगमार्फत हे काम केले जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांना कठोर दंड आकारले जाणार आहेत. वार्षिक उलाढालीच्या २% ते ७% रक्कम दंड म्हणून आकारण्यात येणार आहे. तंत्रज्ञान क्षेत्रात ठोस पावले उचलण्यात युरोपीय महासंघ नेहमीच अग्रस्थानी असतो. लोकांच्या गोपनीय माहितीची तडजोड न होऊ देता विकसनशील तंत्रज्ञानाची सांगड घालणे याकडे युरोपीय महासंघाचे लक्ष असणार आहे. नागरिकांची गोपनियता प्रामुख्याने जपण्यासाठी खंबीर पावले उचलली जात आहेत. नुकतीच ब्रिटनमध्ये 'एआय' सुरक्षितता या विषयावर जागतिक परिषद भरवण्यात आली होती. भारतासह अनेक देशांनी या परिषदेत उपस्थिती नोंदवली. वाढत्या प्रमाणात होणाऱ्या 'एआय'च्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांचा विचार करण्यात आला आणि चिंता देखील व्यक्त केली. पण दुर्दैवाने या चर्चेत फलित असे काही मिळाले नाही.

मागच्या आठवड्यात नवी दिल्ली येथे 'ग्लोबल पार्टनरशिप ऑन आर्टिफिशियल इंटेलिजन्स'ची शिखर परिषद पार पडली. त्यात 'एआय' निगडित अनेक विषयांवर सखोल चर्चा झाली, पण युरोपिय महासंघासारखा कायदा किंवा त्याबाबतची तरतूद असे परिषदेच्या दरम्यान फार काही झाले नाही. कायदे हवेत याबाबत सर्वांचं एकमत होते, पण नक्की काय; असे ठोस काही चर्चेअंती गवसले नाही. आजमितीला 'एआय'च्या बुद्धीवर, वेगावर अंकुश ठेवण्याची गरज आहे. त्याकरता कायद्याशिवाय गत्यंतर नाही, याची जाणीव देखील आहे. विविध देश, त्यांची सरकारे या विषयाचा सखोल अभ्यास करीत आहेत. पण 'एआय'च्या वापराबाबत कायद्याची चौकट निर्माण करण्यासाठी मसुदा बनवणारे युरोपीय महासंघ एकमेवच.

# SUPERFOOD BEETROOT : KNOW THESE 5 BENEFITS OF CHUKANDAR



Beetroot, or Chukandar as it's fondly called in India, is often relegated to the sidelines of our vegetable platters. But this vibrant crimson root vegetable deserves much more than just a side dish cameo. Packed with essential nutrients and boasting impressive health benefits, beetroot is a true superfood in disguise. In this article, we will explore 5 compelling reasons to incorporate this humble root vegetable into your diet.

Rich in nutrients: Beetroot is packed with vitamins and minerals like vitamin C, potassium, folate, and manganese, they act like a shield for your body. These nutrients play crucial roles in supporting immune function, maintaining healthy blood pressure, and promoting optimal cellular function.

Boosts heart health: Beetroot is rich in nitrates, which your body converts into nitric oxide. This molecule acts like a magic bullet, relaxing blood vessels, improving blood flow, and lowering blood pressure. This translates to a healthier heart, reduced risk of stroke, and even enhanced athletic performance.

Supports detoxification: Beetroot is known for its detoxifying properties, thanks to compounds like betalains that aid in the elimination of toxins from the body. Regular consumption of beetroot can support liver function, helping the body efficiently detoxify and maintain optimal health.

Cancer-fighting properties: Beetroot isn't just delicious, it's also brimming with compounds that might help fight cancer! These include names like betaine, ferulic acid, and rutin, all of which can slow down the growth and division of cancer cells in lab studies. While more research is needed, early evidence suggests that regularly enjoying beetroot could put you on the winning side of this battle.

Brain booster: Beetroot's not just good for your heart! It helps your brain too. Studies show that eating beetroot and exercising together boost blood flow to the thinking part of your brain, making you sharper and quicker. Plus, the nitrates in beetroot might even improve your reflexes and reaction time. So, grab a beetroot salad after your workout and give your brain a boost!

# दही की ताक?, आरोग्यासाठी सर्वाधिक गुणकारी काय?



केतकी दुग्धजन्य अथवा डेअरी प्रोडक्ट्समध्ये दही आणि ताक यांना मोठ्या प्रमाणावर मागणी असते. दुधापासून तयार केलेले दह्यात मोठ्या प्रमाणावर प्रथिने, प्रोबायोटिक्स आणि आवश्यक पोषक तत्वे असतात. तसेच, दह्याला घुसळून ताक तयार केले जाते. ताकालाही आयुर्वेदात एक विशेष महत्व आहे. खरे तर दही आणि ताक हे आपल्या पारंपरिक आहाराचा भाग आहे. यामुळे खाल्लेले अन्न पचण्यासही मदत होते आणि आरोग्याच्या दृष्टीने यांचे मोठे फायदेही आहेत.

दही - दुधापासून दही बनविण्याच्या प्रक्रियेत उपयोगी बॅक्टेरियामुळे लॅक्टोज अर्थात दुधातील साखरेचे लॅक्टिक ॲसीडमध्ये रुपांतर होते. यामुळे दह्याला आंबट चव येते आणि ते विशेष बनते.

दह्याचे आरोग्यदायी फायदे - दही हा probiotics अर्थात प्रतिजैविकाचा अथवा उपयुक्त बॅक्टेरियाचा एक उत्तम सोर्स आहे. यामुळे पचन क्रिया चांगली राहण्यास मदत होते आणि पोषक तत्वेही मिळतात. महत्वाचे म्हणजे दह्यात उच्च प्रतिचे प्रोटीन्स देखील प्रमाणावर असतात. जे स्नायू आणि एकूणच शरीरासाठी अत्यंत उपयुक्त असतात. याशिवाय, दह्यात लक्षणीय प्रमाणात कॅल्शियमही असते. ज्यामुळे आपली हाडे आणि दात मजबूत होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

रोगप्रतिकार शक्ती वाढते - दह्यामध्ये प्रतिजैविके असतात जे आपली रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतात. यामुळे आपल्या शरीराचे संसगार्पासून संरक्षण होते आणि पचन क्रियाही सुधारते.

ताक आणि त्याचे आरोग्यदायी फायदे - ताकामध्ये लॅक्टिक ॲसिड असते, ज्यामुळे पचन क्रिया चांगली राहते अर्थात ते पचनाला मदत करते आणि पोट चांगले ठेवते. महत्वाचे म्हणजे, अनेकवेळा अपचासारखी समस्या अथवा ॲसिडिटी दूर ठेवण्यासाठीही हे घेतले जाते. दह्या प्रमाणेच ताकातही प्रोबायोटिक्स असतात. जे निरोगी ठेवण्यास मदत करतात. यामुळे पचन क्रिया चांगली होण्याबरोबरच रोगप्रतिकार शक्तीही वाढते.

पोषक तत्वांचा एक उत्तम स्रोत अन्‌फॅट्स देखील कमी - महत्वाचे म्हणजे ताक हा अनेक आवश्यक पोषक तत्वांचा एक उत्तम स्रोत आहे. यात कॅल्शियम, व्हिटॅमीन इ12, रिबोफ्लेविन आणि फॉस्फरसचा समावेश होतो. याशिवाय दुधाच्या तुलनेत ताकामध्ये फॅट्सचे प्रमाणही कमी असते. ताक हे एक हायड्रेटिंग पेयही आहे. विशेष म्हणजे, ताकामध्ये चांगल्या प्रमाणावर कॅल्शियम आणि फॉस्फोरस असते. जे हाडे मजबूत आणि निरोगी ठेवण्यासठी मदत करते.

दही की ताक? आरोग्यासाठी सर्वाधिक गुणकारी काय? - दही आणि ताकाचा विचार करता, ताक हा दह्याला एक उत्तम आणि आरोग्याच्या दृष्टीने चांगला पर्याय असल्याचे आयुर्वेदाने म्हटले आहे. तसेच, ताकासोबत जिरे पावडर, मीठ आणि कोथिंबीर यांसारख्या मसाल्यांचा वापर केल्याने ताकाचा केवळस्वादच वाढत नाही, तर त्याचे आरोग्य फायदे देखील वाढवतात.

# हेमंत ढोमेच्या सासूबाईं उज्वला जोगयांनी केला 'जमाल कुडू'वर जबरदस्त डान्स




टिप्स रणबीर कपूरच्या'ल्ल्रे' या सिनेमाची सध्या प्रेक्षकांमध्ये क्रेझ आहे. यातही बॉबी देओलचं एन्ट्री साँग जमाल कुडू हे नाव चांगलंच ट्रेंड होतंय. आतापर्यंत या गाण्यावर सामान्यांसोबतच अनेक सेलिब्रिटींनीही भन्नाट व्हिडीओ शूट करत रिल्स शेअर केले आहेत. विशेष म्हणजे या गाण्यावर ठेका धरायचा मोह अभिनेत्री उज्वला जोग यांनाही आवरला नाही. सध्या सोशल मीडियावर प्रसिद्ध अभिनेत्री उज्वला जोग यांचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये त्यांनी नऊवारी साडी नेसली असून त्या जमाल कुडू या गाण्यावर भन्नाट डान्स करताना दिसत आहेत. विशेष म्हणजे त्यांनी अत्यंत सहजसुंदर पद्धतीने डान्स केला. त्यामुळे नेटकरी त्यांच्या व्हिडीओवर लाइक्स आणि कमेंटचा पाऊस पाडत आहेत.

# अभिनेत्री मृणाल दुसानिस सध्या काय करते

'तू तिथे मी', 'माझिया प्रियाला प्रीत कळेना', 'सुखाच्या सरींनी हे मन बावरे' या लोकप्रिय मालिकांमधून अभिनेत्री मृणाल दुसानिस घराघरात पोहचली आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील एक दिलखुलास चेहरा म्हणून तिला ओळखले जाते. मृणालने आपल्या सुंदर अभिनयाने आणि निरागस चेहऱ्याने प्रेक्षकांचं मन जिंकलं आहे. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून ही अभिनेत्री छोट्या पडद्यापासून दूर आहे. तर सध्या मृणाल काय करते? कुठे आहे ? हे आपण जाणून घेऊया. अभिनय सोडल्यानंतर अभिनेत्री पती आणि मुलीसोबत सध्या अमेरिकेतील टेक्सास प्रांतातल्या डल्लास या शहरात वास्तव्यास आहे. मृणाल सोशल मीडियावरही फारशी सक्रिय नव्हती. परंतु आता हळूहळू ती सोशल मीडियावर सक्रिय होताना दिसून येत आहे. नुकतेच मृनालने लेक आणि पतीसोबत अमेरिकेत खिसमस सेलिब्रेशन केलं. याचे व्हिडीओ आणि फोटो तिने



सोशल मीडियावर शेअर केले. मृणालच्या लेकीचं नाव नुर्वी तर पतीचं नाव नीरज मोरे असे आहे. दोघांनी 2016 मध्ये लग्न केलं. नीरज हा सॉफ्टवेअर इंजीनीअर आहे. त्यानंतर मृणालनं अभिनयक्षेत्रामधून ब्रेक घेतला होता. नंतर तिनं 2018 मध्ये 'सुखाच्या सरींनी हे मन बावरे' या मालिकेमधून तिनं दमदार कमबॅक केलं. मृणालने 24 मार्च 2022 ला मुलीला जन्म दिला.



# 'तुला पाहते रे' फेम प्रसिद्ध अभिनेत्री सोनल पवार अडकली विवाहबंधनात

अयोध्येमध्ये सध्या मराठी कलाविश्वात लग्नसराई पाहायला मिळत आहे. एका पाठोपाठ अनेक कलाकार लग्नाच्या बेडीत अडकत आहेत. नुकतेच स्वानंदी टिकेकर-आशिष कुलकर्णी, गौतमी देशपांडे-स्वानंद तेंडुलकर आणि मानसी घाटे-आकाश पंडीत यांनी लग्नगाठ बांधली. त्यानंतर आता आणखी एका अभिनेत्रीने लग्न केले आहे. ही अभिनेत्री म्हणजे तुला पाहते रे फेम सोनल पवार. गुरुवारी तिने समीर पालुष्टेसोबत लग्नगाठ बांधली आहे. तिच्या लग्नाचे व्हिडीओ सोशल मीडियावर पाहायला मिळत आहे. अभिनेत्री सोनल पवार गुरुवारी म्हणजेच २८ डिसेंबरला समीर पालुष्टेसोबत विवाहबद्ध झाली आहे. सध्या सोशल मीडियावर तिच्या लग्नाचे फोटो आणि व्हिडीओ पाहायला मिळत आहे. वधूच्या गेटअपमध्ये ती खूपच सुंदर दिसते आहे.

## HEALTH AND SPORTS

# JEMIMAH-VASTRAKAR'S FREE-FLOWING FIFTIES POWER INDIA TO 282 FOR EIGHT



**NEW DELHI :** Middle-order batters Jemimah Rodrigues and Pooja Vastrakar scored fine half-centuries, and shared a 68-run partnership, to help India post an imposing 282 for 8 in the IND-W vs AUS-W 1st ODI on Thursday. Jemimah scored 82 off 77 deliveries, while Vastrakar remained unbeaten on 62 off just 46 balls as the two ensured a huge total for India at the Wankhede Stadium. Australia spinner Georgia Wareham and Ashleigh Gardner grabbed two wickets each for the visitors. Earlier in the IND-W vs AUS-W 1st ODI, India skipper Harmanpreet Kaur won the toss and elected to bat against Australia in the opening women's ODI of the three-match series here on Thursday. India are without vice-captain Smriti Mandhana who was unwell for the contest. Left-arm spinner Saika Ishaque makes her 50-over debut for India. India have only 10 wins and 40 losses to show from 50 ODIs against Australia overall, while at home, their record has been simply terrible. With only four wins in 21 ODIs and 17 defeats at home, India have not beaten Australia in any of their last seven matches playing at home since February 2007. In fact, the last time India and Australia played ODI cricket at the Wankhede Stadium, the home team suffered heavy defeats in March 2012, losing by 221 runs and five wickets in the last two ODIs of the three-match series. India had lost the opening ODI heavily at Ahmedabad by 30 runs and were eventually whitewashed. However, India have a new leadership pair of skipper Harmanpreet and coach Amol Majumdar and it will be a perfect opportunity to bolster their preparations for the ODI World Cup in 2025. These games will also bring a chance to improve a recent poor record in 50-overs cricket against this opponent.

# 'LISTLESS': GAVASKAR QUESTIONS INDIA'S ATTITUDE IN SCATHING ATTACK AFTER ELGAR, JANSEN FLATTEN TOOTHLESS BOWLERS



**NEW DELHI :** If it was former India head coach Ravi Shastri slamming India's tactics of starting the second session of Day 2 with Shardul Thakur and Prasidh Krishna instead of Jasprit Bumrah and Mohammed Siraj, it was the legendary Sunil Gavaskar launching an attack on the body language of the Indian players in the morning session of Day 3 of the first Test against South Africa. Gavaskar said India's body language and performance in the first hour of play on Thursday at the Supersport Park in Centurion was "listless" and they needed to wake up from the slumber as soon as possible. India did start with Bumrah and Siraj but the moment captain Rohit Sharma took them off the attack to preserve them for the second new ball, the floodgates opened. Prasidh and Shardul were once again taken for runs by Marco Jansen and Dean Elgar. In between, some not-so-impressive efforts in the field angered Gavaskar. "India have to wake up. they have been listless. some of the efforts we've seen, some of the body language is very very listless at the moment. Yes, Bumrah bowled a good spell but that was not backed up," Gavaskar said on commentary. Veteran Dean Elgar missed out on a well-deserved maiden double hundred. Still, he inflicted enough damage on India in the company of young Marco Jansen to potentially bat the visitors out of the opening Test as South Africa reached 392 for 7 at lunch. Elgar (185 off 287 balls), whose previous highest Test score is 199, was inching towards his maiden double hundred before a faint tickle to leg-side bouncer from Shardul Thakur brought about his end.

# 'TODAY, PEOPLE ARE SINGING PRAISES. 3 MONTHS AGO, EVERYONE WAS ABUSING ME'



**NEW DELHI :** The year 2023 presented a series of challenges for KL Rahul. His troubles began with being sidelined from the T20I side at the start of the year, resulting from inconsistent performances in the 2022 T20 World Cup. After a string of low scores, he also lost his place in the XI mid-way through the home Border-Gavaskar trophy. While Rahul assumed wicketkeeping responsibilities in ODIs following Rishabh Pant's unfortunate car accident, Rahul's anticipation for the 2023 World Cup suffered a setback due to a hamstring injury sustained during IPL 2023. This injury cost him the opportunity to represent India in the World Test Championship final, where the team faced a significant 209-run loss against Australia. Rahul's comeback to the side during the Asia Cup 2023 showcased his impressive wicketkeeping skills. However, the spotlight intensified on his batting performance in the World Cup final. Despite scoring 66 runs, his slow-paced innings of 107 balls, featuring only one boundary, drew heavy criticism from both fans and experts. India ultimately lost the final by six wickets, and Rahul found himself at the centre of harsh critique, even enduring online abuse from some disgruntled fans. But the 31-year-old is now on an upward trajectory, leading the Indian ODI side to a 2-1 win against South Africa earlier this month. On Wednesday, Rahul notched his 8th Test century in Centurion, and, while addressing the media, took a look back at a challenging year laced with a mixed bag of frustrations and opportunities.

# GOING LOW-CARB FOR WEIGHT LOSS? DOCTORS SAY IT WON'T ALWAYS WORK - KNOW WHAT TO EAT INSTEAD



There are many people who believe that losing weight is about knowing how much carbs to cut from the diet. However, according to a study, cutting down on the source of energy to allow the body to burn fat for it does not always work. As per Harvard University researchers, diets that include some refined carbs and proteins from meat are the ones that make people gain weight. According to experts, only low-carb diets that focus on plant proteins and fats along with whole grains can help people lose weight. The quality of low-carb diets have a key role to play in long-term weight change and modulation. These are associated with less weight gain woes. Conventionally, low-carb diets restrict intake of sugary foods, pastas and breads. Earlier, research suggested that diets that do so can help people not just lose weight but also manage blood sugar levels well. The latest one, published in JAMA Network Open, evaluated data from over 123000 adults to check whether low-carb diet had an impact on weight loss. For this, researchers tracked people on low-carb diets emphasising either meat proteins and fats or white carbs like healthy fats and plant proteins. Diets were then assessed every four years with questionnaires and people who ate fewest refined carbs witnessed more weight loss than those who ate most. Additionally, these results were more relevant in people who were already obese. It was noted that more prominent weight changes occurred in low-carb diets that emphasised intake of high-quality macronutrients from healthy plant foods noted less weight gain. Low-carb diets focus on healthy fats, proteins – both plant and animal – and they are strongly associated with weight loss.



# 5 HABITS THAT ARE ACTUALLY SELF-DOUBT : THERAPIST EXPLAINS

Often, we feel that we are not confident with ourselves - our life choices, our decisions and our opinions. Self-doubt can crumble our self-confidence and self-awareness. It can make us doubt everything that we say or do. "When we look at others it's easy to fall into the trap of only seeing their confidence and successes. Rarely do we dig deeper than that. I used to think that confidence meant we have it all figured out that there is no more doubt. And oh boy was I wrong! Confidence doesn't mean you have it figured out; it's trusting that you can. You can be confident and still have doubts. You can have doubts and still be confident," wrote Therapist Klara Kernig. Here are a few habits that are actually self-doubt: Overthinking before making a decision: Even if the decision is a small one and it won't affect us much, we have a difficult time taking the decision. We think and overthink and weigh the pros and cons to decide. This happens because deep down we are not sure about what we want. Asking others for opinion: We are not sure about our own perspectives and opinions, and hence, we go around asking people about theirs. Sometimes, we also ask people and seek their help to help us make decisions. Scared of sharing ideas: We feel that our ideas and opinions may not be important enough to be shared. Sometimes, even when we gear up to share our opinions, we preface it with an apology because we do not want to offend others. Comparison: We always get into the unhealthy loop of comparing ourselves with others. We compare our life choices, decisions and timelines with that of others and feel that we are not doing good enough. Procrastination: We often mistake procrastination to be a time management issue, while it is actually an emotional management issue. We try to procrastinate when we are not ready to face things.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore.
• Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Advisor: D. K. Pandey B.A.L.L.B.(High Court Mumbai), (ठाणे न्याय कक्षेत)

